गृह विभाग

महाराष्ट्र शासन

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

हंस भुग्रा मार्ग, विद्यानगरी, कलीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

दूरध्वनी क्र.०२२-२६६७ ०७५५/०७५८/०९६५

ई-मेल :- dir.fsl@maharashtra.gov.in

Web :- dfsl.maharashtra.gov.in


# जाहिरात क्र.४ (सन-२०२५)

## सेवानिवृत्त विधी अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नामिकासूची (Panel) तयार करणे...

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ व दि.०८.०९.२०२३ नुसार व गृह विभाग, शासन पत्र क्र.एफएसएल ०४१८/प्र.क्र.२८२(अ)/पोल-४, दि.२९.११.२०१९ अन्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई आस्थापनेवर निव्वळ तात्पुरत्या तत्वावर करार पध्दतीने १ वर्षासाठी गट-अ (ग्रेड पे रु.७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून अनुभवी विधी अधिकारी (गट-अ) अधिकाऱ्याची नियुक्ती साठी शासकीय कार्यालये/शासकीय उपक्रम/संविधिक संस्था/मंडळे/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था मधील सेवानिवृत्त अधिका-यांमधून करार पध्दतीने नामिकासूची (Panel) करण्यासाठी विहीत केलेल्या नमुना अर्जाप्रमाणे आवेदन अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर आवेदन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.१९.०१.२०२६ अशी राहिल. प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करुन १ वर्षासाठी नामिकासूची (Panel) तयार करण्यात येईल व त्यानुसार नेमणूक करण्यात येईल.

आवेदन अर्ज खालील पत्यावर फक्त स्पीडपोस्ट किंवा रजिस्टर पोस्टाव्दारे स्विकारले जातील तसेच विहित कालावधीत न आलेले अर्ज व पूर्ण न भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

पत्ता : संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, हंस भुग्रा मार्ग, विद्यानगरी, कलीना (मुंबई विद्यापीठाजवळ), सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

| अ. क्र. | पदनाम | दर्जा | अर्हता व अनुभव | पद संख्या व नियुक्तीचे ठिकाण | मासिक पारिश्रमिक व भत्ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी (गट-अ) | गट-अ (ग्रेड पे रु.७६००/- पेक्षा कमी) | १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल.<br>२. विधी अधिकारी, गट-अ या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. आणि अपवादात्मक परिस्थितीत विहित अनुभव कालावधी प्राप्त | १ (मुंबई) | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.०८.०९.२०२३ च्या परिशिष्ट-अ प्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | झालेले अधिकारी उपलब्ध न झाल्यास अनुभव कालावधी शिथिल करण्यात येईल.<br>३. उमेदवार सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.<br>४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान आवश्यक असेल. | | |

**विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक त्या संबंधीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह सादर करणे आवश्यक आहे.**

**इतर अटी व शर्ती :-**

१. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टिने पूर्ण असावेत, विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. उमेदवारानी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात, उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

३. पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पुर्ण असावा.

४. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

६. निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मुंबई प्रयोगशाळेत निव्वळ तात्पुरत्या तत्वावर १ वर्षे मुदतीसाठी अथवा नियमित तत्वावर उपलब्ध होईपर्यंत करार पध्दतीने नेमणूका करण्यात येतील व या कालावधीत वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहतील.

७. निवड झालेल्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

८. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

९. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अलिकडील फोटो व मान्यता प्राप्त फोटो ओळखपत्र तसेच शैक्षणिक पात्रता, राखीव प्रवर्गासाठी आवश्यक असलेले सर्व प्रमाणपत्र व अनुभवा संदर्भात आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या सांक्षाकित प्रती नेमणूकीच्या वेळी सोबत आणाव्यात.

१०. निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे पत्र नेमणूकीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

११. सेवानिवृत्त अधिका-या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अगर प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१२. नियुक्तीनंतर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या संचालनालयाची असणार नाही.
१३. सेवानिवृत्त अधिकारी यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
१४. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
१५. सेवानिवृत्त अधिका-यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.
१६. करार पद्धती वरील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
१७. सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निक्षित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
१८. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
१९. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येणार नाही.

**कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सेवाविषयक/प्रशासकिय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबधित अधिका-याचे मदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५. जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झालेस अपीलाचा मसुदा तयार करून तो संबधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.
८. बंदयाचे उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीवर करागृह नियम व इतर नियमांच्या अनुषंगाने शपथपत्र / मुद्देनिहाय अभिप्राय सादर करणे.
९. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, विविध न्यायालये, मानवी हक्क आयोग व इतर वरिष्ठ कार्यालयास या कार्यालयाकडील अभिप्राय देणे.
१०. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) येथील पोलीस प्रशासनाविरोधातील प्रकरणात मुददेनिहाय अहवाल तयार करणे.

११. अल्पसंख्यांक आयोग / माहिती आयुक्त यांचेकडील तसेच अनुसूचित जाती / जमाती आयोगाकडे असलेल्या कोर्ट प्रकरणात मदत करणे.
१२. उपरोक्त नमुद प्रकरणांसह इतर सर्व राज्य घटनानिर्मित प्रकरणात तसेच पोलीस तक्रार प्राधिकरणाकडील प्रकरणात व वेळोवेळी आलेली सर्व प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणात मदत करणे.
१३. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करतील.

**महत्वाच्या विशेष सूचना :-**

१. सदर करार पध्दतीचा कालावधी नियुक्तीपासून फक्त १ वर्षाचा राहील व कालावधीनंतर त्यांची आपोआप सेवा संपुष्टात येईल.
२. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील तसेच विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा व नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, या आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहील.
३. निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी १०० रूपयांच्या बॉड पेपरवर नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र/बंधपत्र द्यावे लागेल.
४. प्रयोगशाळेच्या कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरतीप्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई यांना राहतील.
६. निवड झालेल्या उमेदवाराने जर ७ दिवसांत नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यास स्वारस्य नाही, असे समजून कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**स्वाक्षरी/-**
( डॉ.वि.ज.ठाकरे )
प्र.संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,म.शा.
आणि शासकीय रासायनिक विश्लेषक

दिनांक :- २२.१२.२०२५
स्थळ :- मुंबई.

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा.संचालक,
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
कलीना, सांताक्रझ (पूर्व),
मुंबई-४०० ०९८.

स्वसाक्षांकित केलेला अलीकडच्या काळातील Passport Size Color Photo

ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पदनाम : ____________________

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मी शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून मला त्या मान्य आहेत. त्यानुसार वरील विषयात नमूद केलेल्या पदाचे काम करण्यास इच्छूक असून मी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त अधिकारी यांचे पूर्ण नांव व प्रवर्ग | |
| २ | पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता/संपर्क दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक/Email ID आणि संबंधित हद्दीतील पोलीस ठाणे | |
| ३ | सेवानिवृत्तीवेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४ | शासकिय सेवेत प्रवेश केल्याचा दिनांक/शासकिय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक (कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत यासोबत सादर केली आहे) | |
| ६ | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| ७ | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ८ | अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र. | |
| ९ | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागत असल्यास तसे हमी पत्र सोबत जोडणे आवश्यक. | |
| १० | सदयस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह). | |
| ११ | अर्ज केलेल्या पदासाठी अनुभव कालावधी आणि काम केलेल्या विभागाचे/कार्यालयाचे नाव व ठिकाण. | |

स्थळ : -
दिनांक :- (सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव व दिनांकित स्वाक्षरी)